Estd: 1962

“A++” Accredited by NAAC (2021)
with CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## (सविस्तर जाहिरात क्र. २४/२०२२)

**Post Code No. 24/22 - 01**

महाराष्ट्र राज्यामधील सर्व अकृषी विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या सर्व महाविद्यालयाच्या / संस्थेच्या प्राचार्यांना / संचालकांना आणि विद्यापीठामधील सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक यांना कळविणेत येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम २३ (क) आणि महाराष्ट्र शासन यांनी दि. १० ऑक्टोबर, २०१८ रोजी प्रसिध्द केलेल्या एकरूप परिनियम क्रमांक १ अन्वये शिवाजी विद्यापीठामध्ये संचालक, विद्यार्थी विकास यांची नामनिर्देशनाद्वारे नियुक्ती करावयाची आहे.

### संचालक, विद्यार्थी विकास :

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ नुसार आणि एकरूप परिनियम क्रमांक १ नुसार सदर पदाकरिता आवश्यक अर्हता, वित्तलब्धी, पदावधी आणि सेवेच्या अटी व शर्ती या खालीलप्रमाणे असतील.

१. **नामनिर्देशन प्रक्रिया** - मा. कुलगुरू पात्र इच्छुक उमेदवारांकडून अर्ज मागवील आणि त्यांच्यामधून एका योग्य व्यक्तीला संचालक, विद्यार्थी विकास म्हणून तीन वर्षांच्या पदावधीकरिता, जो आणखी एका मुदतीसाठी नवीकृत करता येईल-नामनिर्देशित करील. याबाबत मूळ महाविद्यालय किंवा मूळ मान्यताप्राप्त परिसंस्था किंवा मूळ विद्यापीठ सदर पदावर प्रतिनियुक्त झालेल्या व्यक्तिच्या जागी दुसऱ्या व्यक्तिची नेमणूक त्या त्या वेळी अस्तित्वात असलेल्या निकषानुसार करू शकेल.

२. **अर्हता** - संचालक, विद्यार्थी विकास या पदाकरिता अध्यापनाचा किमान एकूण दहा वर्षाचा अनुभव असणाऱ्या आणि अभ्यासेत्तर व विस्तार कृतिकार्यक्रम क्षेत्रामध्ये समाधानकारक कामगिरी पार पाडलेल्या अध्यापकांमधून कुलगुरूकडून नामनिर्देशित करण्यात येईल. तो कुलगुरूच्या थेट अधीक्षणाखाली, निदेशनाखाली व नियंत्रणाखाली काम करील.

३. **वित्तलब्धी** - संचालक, विद्यार्थी विकास म्हणून नामनिर्देशित केलेली व्यक्ती संचालक, विद्यार्थी विकास म्हणून तिचे नामनिर्देशन केल्याच्या दिनांकास तिच्या पूर्वीच्या सेवेत असताना तिला जितकी वित्तलब्धी व वेतनमान मिळत असेल तितकी वित्तलब्धी व वेतनमान मूळ महाविद्यालय किंवा मूळ मान्यताप्राप्त परिसंस्था किंवा मूळ विद्यापीठ याकडून मिळण्यास हक्कदार असेल.

४. **वय** - संचालक, विद्यार्थी विकास या पदाच्या नामनिर्देशनासाठी इच्छुक असलेल्या उमेदवाराचे वय हे नामनिर्देशनाच्या वेळेस ५० वर्षापेक्षा जास्त असणार नाही.

५. **सेवेच्या अटी व शर्ती** - (१) संचालक, विद्यार्थी विकास याच्या सेवेच्या अटी व शर्ती हया, त्याच्या मूळ पदाच्या अटी व शर्तीप्रमाणेच असतील आणि संचालक, विद्यार्थी विकास म्हणून त्याच्या पदावधीदरम्यान त्याला अहितकारक होईल अशा प्रकारे त्या बदलता येणार नाहीत.

(२) संचालक, विद्यार्थी विकास म्हणून नामनिर्देशन झाल्यावर, त्याच्या मूळ पदावर त्याने घेतलेले अंतिम वेतन संरक्षित केले जाईल.

(३) संचालक, विद्यार्थी विकास म्हणून नामनिर्देशित झालेल्या व्यक्तीचा, नामनिर्देशनापूर्वी तिने धारण केलेल्या कायम पदावर धारणाधिकार असेल आणि त्या पदाच्या सेवेच्या अटी व शर्तीनुसार तो तिच्या मूळ पदावरून सेवानिवृत्त झाल्याप्रमाणे असेल.

(४) संचालक, विद्यार्थी विकास हा थेट कुलगुरूंच्या पर्यवेक्षणाखाली व नियंत्रणाखाली काम करील.

Cont ...

(५) संचालक, विद्यार्थी विकास यास कुलगुरूला उद्देशून एक महिन्याची नोटीस देऊन आपल्या पदाचा लेखी स्वरूपात त्याच्या स्वाक्षरीने राजीनामा देता येईल आणि कुलगुरूने त्याचा राजीनामा स्वीकारल्यावर किंवा उक्त नोटिशीचा कालावधी समाप्त झाल्याच्या दिनांकापासून यापैकी जे अगोदर घडेल तेंव्हापासून त्याचे पद धारण करण्याचे बंद होईल.

(६) संचालक, विद्यार्थी विकास यास कुलगुरूकडून एक महिन्याची लेखी नोटीस देऊन त्याच्या पदावरून कार्यमुक्त करण्यात येईल.

तरी उपरोक्त परीनियमानुसार संचालक, विद्यार्थी विकास या पदासाठी पात्र इच्छुक उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज दि. १६ जून, २०२२ पर्यंत भरून त्याची छापील प्रत / Hard Copy दि. २७ जून, २०२२ पर्यंत मा. कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचे नावे आवश्यक त्या कागदपत्रांसहित आपल्या प्राचार्य / संचालक / अधिविभागप्रमुख यांच्या मार्फत सादर करावी. याकरिता रू. ५००/- इतकी फी ऑनलाईन पध्दतीने भरावी व त्याची पावती अर्जासोबत जमा करावी. ऑनलाईन अर्ज शिवाजी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर www.unishivaji.ac.in वर Recruitments या लिंकवर ठेवणेत आला आहे. सदर पदासाठीचा अर्ज दिलेल्या मुदतीमध्ये विद्यापीठ कार्यालयास स्व:हस्ते अथवा पोष्टाने पाठवून द्यावा.

सही /-

**प्रभारी कुलसचिव**

**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर**

स्थळ : कोल्हापूर.

दिनांक : १८-०५-२०२२